प्रजासत्ताक दिन शिबीर व पंतप्रधान रॅलीसाठी आयोजित शिबीरांकरिता मंजूर तरतुदीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राछासे २६१८/प्र.क्र.२ /क्रीयुसे -३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : १५ मार्च, २०१८.

वाचा:-

१) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ६ फेब्रुवारी, २०१८.

२) क्रीडा व युवक सेवा पुणे यांचे पत्र क्रमांक.राछासे/आरडीसी/२०१७-१८/(१५)/का-५/७१३ दि. १६ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना : -

महाराष्ट्रातील राष्ट्रीय छात्रसेना कार्यालयांना जानेवारी २०१८ मध्ये दिल्ली येथे संपन्न झालेल्या प्रजासत्ताक दिन शिबीर व पंतप्रधान रॅलीसाठी थलसेना, नौसेना व वायुसेना शिबीरे आयोजित करण्यांत येतात. या शिबीरांकरीता झालेल्या खर्चाच्या रक्कमा अदा करणेसाठी सन २०१७-१८ या कालावधीत प्रस्तुत उपक्रमांच्या अंमलबजावणीकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीमधून **रु.३४,५०,४७६/-** इतक्या रकमेचा निधी वितरीत करण्याची बाब या नस्तीवर विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्रातील राष्ट्रीय छात्रसेना यांचे सहभागाने जानेवारी २०१८ मध्ये दिल्ली येथे संपन्न झालेल्या प्रजासत्ताक दिन शिबीर व पंतप्रधान रॅलीसाठी आवश्यक पूर्वतयारी करण्यासाठी थलसेना, नौसेना व वायूसेना यांची शिबीरे आयोजित करण्यांत येतात. या शिबीरांवरील खर्च भागविण्यासाठी **रु.३४,५०,४७६/- (रुपये चौतीस लक्ष पन्नास हजार चारशे शहात्तर फक्त)** इतक्या रकमेचा निधी, वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	**शिबीराचे नाव**	**कार्यालयाचे नाव**	**मंजूर करावयाची रक्कम**
१	टीएससी शिबीर (मुले)	समादेशक अधिकारी, ४ महाराष्ट्र मुलींचे पथक, राष्ट्रीय छात्रसेना, अमरावती	रु. ५,२८,०३३/-
२	टीएससी शिबीर (मुली)	समादेशक अधिकारी, ६ महाराष्ट्र मुलींचे पथक, राष्ट्रीय छात्रसेना, कोल्हापूर	रु. ११,२४,७८४/-
३	एनएससी नौसैनिक शिबीर (मुली)	समादेशक अधिकारी, ३ महाराष्ट्र नाविक दल , राष्ट्रीय छात्रसेना, पुणे	रु. ८,०८,११७/-
४	व्हीएससी-वायुसैनिक शिबीर	समादेशक अधिकारी, ३ महाराष्ट्र नाविक दल , राष्ट्रीय छात्रसेना, पुणे	रु. ९,८९,५४२/-
		एकूण रक्कम :-	**रु. ३४,५०,४७६/-**

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक : ई-३, २२०४-क्रीडा व युवक सेवा-१०२, विद्यार्थ्यांसाठी युवक कल्याण कार्यक्रम (०१)(०१) राष्ट्रीय छात्रसेना योजनेतर (२२०४-००१६-२१) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभागाच्या दि. ६/२/२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित कार्यालयाचे समादेशक अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर संबंधित गटप्रमुख, गटमुख्यालय यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१५१२२४०५५३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.15 12:26:06 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
३. महालेखापाल (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
४. अतिरिक्त महासंचालक, राष्ट्रीय छात्र सेना संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सर्व विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)
६. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे (संचालनालयामार्फत)
६. संबंधित वरीष्ठ कोषागार अधिकारी/जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत)
७. वित्त विभाग (व्यय-५)/ नियोजन विभाग (का. १४७१), मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. संबंधित गटप्रमुख, गटमुख्यालय, राष्ट्रीय छात्र सेना, (संचालनालयामार्फत)
११. समादेशक अधिकारी, राष्ट्रीय छात्रसेना, अमरावती, कोल्हापूर, पुणे, नागपूर.
१२. निवड नस्ती (क्रीयुसे-३).